# दहशतीचे राजकारण जनता सहन करणार नाही : आ. थोरात

**लोकसत्ता वार्ताहर**

माजी खा. डॉ. सुजय विखे यांनी संगमनेर व राहुरी येथून निवडणूक लढविण्याचे संकेत दिले आहेत. त्यावर काँग्रेसचे नेते आ. बाळासाहेब थोरात म्हणाले, की मोठ्याचं लाडकं लेकरू आहे. त्याचा छंद असेल, तर तो पुरवला पाहिजे, या मताचा मी आहे. पक्षाने नाही तर पालकाने छंद पुरवला पाहिजे. संगमनेर व राहुरी विधानसभा मतदारसंघ या दोन्ही ठिकाणी उभा करा. त्यामुळे बालकाचा छंद तर पुरा होईल. – **बाळासाहेब थोरात**, काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते

**राहाता :** आपण कधीही चुकीचे राजकारण केले नाही. सर्वांना बरोबर घेऊन प्रेमाने आणि विकासाचे राजकारण केले म्हणून जनता सातत्याने आपल्या सोबत आहे. त्यांचे सुरू असलेले दहशतीचे आणि जिरवाजिरवीचे राजकारण फार काळ चालणार नसून, दहशतीचे राजकारण आता जनता सहन करणार नाही. अहंकार असणाऱ्यांना जागेवर आणण्याचे काम लोकांनी या लोकसभेत करून दाखवले आहे अशी टीका काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते आमदार बाळासाहेब थोरात यांनी महसूल तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचे नाव न घेता त्यांच्यावर केली.

आश्वी बुद्रुक येथे आज शुक्रवारी आयोजित कार्यक्रमात थोरात बोलत होते. या वेळी अध्यक्षस्थानी माजी आ. डॉ. सुधीर तांबे होते. या वेळी माधवराव कानवडे, दुर्गा तांबे, प्रभावती घोगरे, डॉ. जयश्री थोरात, बाबासाहेब ओहोळ, रिपब्लिकन नेते बाळासाहेब गायकवाड, डॉ. राजेंद्र पिपाडा, गणपतराव सांगळे, गणेश कारखान्याचे अध्यक्ष सुधीर लहारे, नारायणराव कारले यांच्यासह संगमनेर व राहता तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

आ. थोरात म्हणाले, की दहशत व दडपशाही असतानाही आश्वी व परिसराने २५ वर्षे सातत्याने मोठे मताधिक्य दिले. आपण विकासकामांमध्ये कधीही भेदभाव केला नाही. विरोधकांचीही कामे केली. मागील अडीच वर्षांच्या काळात या परिसरातील अनेक पाणीपुरवठा योजना मंजूर केल्या. त्यासाठी पाठपुरावा केला. सर्वांना बरोबर घेऊन प्रेमाचे व विकासाचे राजकारण केले. ही आपली परंपरा आहे. मात्र, याउलट या परिसरामध्ये मोठी दहशत आहे. विरोधी गावचा सरपंच असेल तर अगदी पिण्याच्या पाण्यापर्यंत राजकारणाचे विष या लोकांनी नेऊन ठेवले आहे. जिरवाजिरवीचे आणि दमदाट्याचे राजकारण फार काळ चालत नाही. दहा वर्षे 'गणेश' तुमच्या ताब्यात असताना चांगला चालवता आला नाही. आमची भावना आणि उद्देश चांगला म्हणून गणेश कारखाना अत्यंत चांगला चालला. मात्र, त्यामध्येही अनेक अडचणी निर्माण करण्याचे काम सत्ताधारी करत आहेत. गोरगरिबांच्या प्रपंचाशी खेळू नका. सत्तेचा गर्व जनतेने उतरवला आहे.

या वेळी माजी आ. डॉ. सुधीर तांबे, प्रभावती घोगरे, डॉ. राजेंद्र पिपाडा, डॉ. जयश्री थोरात, रिपब्लिकन नेते बाळासाहेब गायकवाड यांचे भाषण झाले.

# मुलाचा छंद जोपासायला आम्ही सक्षम - विखे

## आ. थोरातांनी शिकविण्याची गरज नाही

**लोकसत्ता वार्ताहर**

**राहाता :** आमच्या मुलाचा छंद जोपासायला आम्ही सक्षम आहोत. याबाबत आम्हाला आ. थोरातांनी शिकविण्याची गरज नाही. तुमच्या घरातील मुलामुलींचा छंद पुरविलेला चालतो. दुसऱ्याच्या मुलाची काळजी का करता, असा मिष्कील टोला महसूल मंत्री राधाकृष्ण विखे यांनी आ.थोरात यांना लगावला.

डॉ. सुजय विखे यांनी संगमनेर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्याचे सूतोवाच केल्यानंतर आमदार थोरातांनी व्यक्त केलेल्या प्रतिक्रियेवर भाष्य करताना मंत्री विखे यांनी आपण तर सर्व घरदार राजकारणात उतरविले आहे. भावापासून ते जावयापर्यंत सर्वच कुटुंब राजकारणात उतरवून तुम्ही तुमचे छंद पूर्ण केलेत, असाही टोला त्यांनी लगावला. डॉ. सुजय हे निर्णय घेण्यासाठी सक्षम आहेत. त्यांच्या मनात काय विचार आहे तो योग्यच असेल. पण या तालुक्यात निर्माण झालेल्या हुकूमशहाने तालुका पूर्ण उद्ध्वस्त केला आहे. केवळ ठरावीक लोकांचा विकास झाल्याने तालुक्याचे काय झाले आहे, हे जनता रोज अनुभवत आहे. लोकांना आता नवीन चेहरा हवा आहे आणि तीच भावना लोकांनी आजच्या मेळाव्यातून व्यक्त केली आहे. लोकभावनेचा आदर करायचा हीच माझी भूमिका आहे. याबाबत पक्षश्रेष्ठींना कळवून योग्य तो निर्णय ते करतील, अशा सूचक शब्दांत मंत्री विखे यांनी एकप्रकारे डॉ. सुजय विखे यांच्या उमेदवारीबाबत पत्रकारांशी बोलताना भाष्य केले आहे.

# गॅस रिफिलिंग केंद्रावर छापा; १११ टाक्यांचा साठा जप्त



**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नगर :** पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बेकायदेशीर सुरु असलेल्या रिफिलिंग केंद्रावर छापा टाकत स्वयंपाकाच्या तब्बल १११ गॅस टाक्यांचा अवैध साठा जप्त केला. त्यामध्ये घरगुती वापराच्या ८० टाक्या रिकाम्या तर व्यावसायिक वापरायच्या ३१ टाक्या भरलेल्या आढळल्या. यासंदर्भात तिघांना अटक करण्यात आली आहे. नगर शहराजवळील वारुळवाडी शिवारात ही कारवाई करण्यात आली.

सोहेल जाकीर शेख (२९, पाईपलाईन हडको, एकविरा चौक, सावेडी), विक्रमसिंह राजबहादुर चव्हाण (३५), प्रल्हादसिंह पप्पूसिंह चव्हाण (२०, दोघे मूळ रा. उत्तर प्रदेश, सध्या वारूळवाडी) अशी अटक केलेल्या तिघांची नावे आहेत. पोलिसांनी १११ गॅस टाकींसह सहा वजनकाटे, सहा गॅस रिफिलिंग यंत्र व मोटर असा ६ लाख ६५ हजार ५०० रुपयांचे साहित्य जप्त केले आहे.

सोहेल शेख हा वारूळवाडी (ता. नगर) शिवारात एका पत्र्याच्या शेडमध्ये घरगुती वापराकरता असलेल्या गॅस टाक्यांचा अवैध साठा करून त्यातील गॅस, व्यावसायिक गॅस टाक्यांमध्ये भरण्याचा बेकायदेशीर उद्योग करत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक दिनेश यांना मिळाली होती. त्यांच्या सूचनेनुसार उपनिरीक्षक तुषार धाकराव, कर्मचारी गणेश भिंगारदे, आकाश काळे, रोहित येमुल, भाऊसाहेब काळे व उद्धव टेकाळे यांच्या पथकाने तेथे छापा टाकला आणि तिघांना ताब्यात घेतले.

# 'शिक्षणादरम्यान श्रमिक बनून सातत्याने मेहनत करा'

**संगमनेर :** स्वप्ने सत्यात उतरविण्यासाठी महाविद्यालयातील शिक्षणादरम्यान श्रमिक बनून सातत्यपूर्ण मेहनत करा, ध्येयाप्रती एकनिष्ठ राहणे हीच भावी यशस्वी आयुष्याची गुरुकिल्ली असल्याचे प्रतिपादन शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी यांनी व्यक्त केले. विद्यापीठ अनुदान आयोगाअंतर्गत प्रथम वर्ष पदवीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'मी माझ्या महाविद्यालयाचा' या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण गायकवाड, उपप्राचार्य डॉ. राजेंद्र लढ्ढा व डॉ. रवींद्र ताशिलदार, उपक्रमप्रमुख डॉ. दिगंबर घोडके यावेळी उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना डॉ. मालपाणी म्हणाले की, सध्याची तरुणाई सोशल मीडियाच्या प्रचंड आहारी जात आहे. रील्सचा क्षणिक आनंद घेत असतांना विद्यार्थ्यांचा अतिशय मौल्यवान वेळ वाया जातो. म्हणूनच मोबाईलचा वापर गरजेइतकाच करताना त्यावर मनाचे आणि वेळेचे बंधन घातले पाहिजे. महाविद्यालयाची पदवीची तीन वर्षे ही भावी आयुष्याची दिशा ठरवित असतात. ध्येयनिष्ठा, अभ्यासात सातत्य बाळगून श्रमिक म्हणून मेहनत केल्यास प्रत्येक विद्यार्थ्याचे भावी आयुष्य यशस्वी होऊ शकते.

# कुऱ्हाडीचे घाव घालून महिलेचा खून; अन्य दोघे जखमी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नगर :** निपाणी वडगाव (ता. श्रीरामपूर) येथील भोसले वस्तीवर एका महिलेचा कुऱ्हाडीचे घाव घालून खून करण्यात आला. ही घटना मध्यरात्रीच्या सुमारास घडली. यामध्ये अन्य दोघे गंभीर जखमी झाले आहेत. पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना ताब्यात घेतले आहे.

मुन्ना शेख नूर पठाण यांनी पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. शम्मा शेख नूर पठाण असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. कुऱ्हाडीच्या घावामुळे भाचा साहिल व भाची महेक सय्यद हे दोघे जखमी झाले आहेत. नाजूक कारणामुळे ही घटना घडल्याची प्राथमिक माहिती आहे. पोलिसांनी आकाश पूर्ण नाव नाही व एका विधिसंघर्ष बालकाला ताब्यात घेतले आहे. हे दोघे मध्यरात्री एकच्या सुमारास शम्मा पठाण यांच्या घरात घुसले. आकाशने त्याच्या हातातील कुऱ्हाडीचा घाव घालत साहिल यास ठार मारण्याच्या उद्देशाने जखमी केले. शम्मा पठाण सोडवण्यासाठी मध्ये पडल्या असता त्यांच्याही डोक्यात कुऱ्हाडीने वार केले. त्या जागीच गतप्राण झाल्या. हल्ल्यात महेक सय्यद ही जखमी झाली. घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलबर्गे, उपअधीक्षक डॉ. बसवराज शिवपुंजे, पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, गुन्हे शाखेचे निरीक्षक दिनेश आहेर, ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

---

## एयू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड (शेड्युल्ड कमर्शियल बँक)

AU SMALL FINANCE BANK — A SCHEDULED COMMERCIAL BANK

नोंद. कार्यालयः 19-अ, धुलेश्वर गार्डन, अजमेर रोड, जयपूर-302001 राजस्थान (भारत) (CIN: 36911RJ1996PLC011381)

**परिशिष्ट- IV-A - [नियम 8(6) ची तरतूद पाहा] अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 च्या नियम 8 (6) सह वाचण्यात येणारया सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 अंतर्गत अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे कर्जदार / सह-कर्जदार / गहाणकार व जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेस कळविण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण असलेल्या खालील अचल मालमत्तेचा **एयू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड (ए शेड्युल्ड कमर्शियल बँक)** च्या, यापुढे **एयूएसएफबी** असा उल्लेख करण्यात येईल, सुरक्षित धनकोने संरचनात्मक / प्रत्यक्ष ताबा घेतलेला आहे. सदर अनामत मत्तेची **एयूएसएफबी** म्हणजे सुरक्षित धनको यांना घेणे असलेल्या खाली नमूद रक्कम अधिक पुढील व्याज, शुल्के, खर्च, अधिभार इ. च्या वसुलीसाठी असून तिची **"जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे"** आणि **"तेथे जे काही आहे"** तत्त्वावर विक्री करण्यात येईल.

याद्वारे आपणांस कळविण्यात येते की सदर जाहीर ई-लिलाव **https://sarfaesi.auctiontiger.net** या वेबसाईटमार्फत घेण्यात येईलः

| कर्ज खाते क्र./ कर्जदाराचे/सह-कर्जदाराचे/ गहाणकाराचे/ जामीनदाराचे नाव | 13 (2) मागणी सूचनेचा दिनांक व रक्कम | ताबा दिनांक | मालमत्तेचे वर्णन | मालमत्तेसाठी आरक्षित किंमत | मालमत्तेसाठी बयाणा रक्कम | ई-लिलावाचा दिनांक व वेळ | बोली सादर करण्याचा दिनांक व वेळ | निविदा सादरीकरण ई-लिलावाचे स्थान | संपर्क व्यक्ती आणि मालमत्तेच्या पाहणीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (कर्ज खाते क्रमांक) L9001060122049880 मांडेश्वर किराणा स्टोअर्स (कर्जदार), वाकडे देवीचंद नाना नाना वाकडे नाना यांचा मुलगा (सह-कर्जदार) | **17-जानेवारी-22 रु. 6,74,881/-** रुपये सहा लाख चौऱ्याहत्तर हजार आठशे एक्क्याऐंशी फक्त. दि. 13-जाने-22 रोजी नुसार | **25-एप्रिल-24** | मिळकत क्र. 207, (विक्री करारानुसार 209), मौजे मांडवे, ते.- पाथर्डी, जि.- अहमद नगर, महा. येथे स्थित मालमत्ता. **मोजमाप - 285.78 चौ. मीटर** | **रु. 8,00,000/-** रुपये आठ लाख फक्त. | **रु. 80,000/-** रुपये ऐंशी हजार फक्त. | **11- सप्टेंबर-24 रोजी** दुपारी 2.00 ते 4.00 वा. अमर्यादित 5 मिनिटांच्या विस्तारासह | **09-सप्टेंबर-24 रोजी** किंवा त्यापूर्वी | **एयू स्मॉल फायनान्स बँक लि., शाखा पत्ताः** प्लॉट क्र. 101/83, फायनल प्लॉट क्र. 101, टीपी स्कीम क्र. 4, तळमजला, साईदीप एक्झिक्युटिव्ह, एसजी कायगावकर ज्वेलर्स जवळ, सावेडी, अहमदनगर, महाराष्ट्र- 414003. | रवींद्र देवरे/ दीपक जैन 7039052930 9773358234 auctions@aubank.in 06- सप्टेंबर-24 |

**ई-लिलावाच्या अटी व शर्तीः**

(1) सदर अनामत मत्तेचा ई-लिलाव विक्री सुरक्षित धनको म्हणजे एयूएसएफबी यांचेसाठी व यांचे वतीने "जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे", "तेथे जे काही आहे" आणि " इतर उपाय नाही" तत्त्वावर असेल. सदर मालमत्तेवर कोणतेही ज्ञात बोजे नाहीत.

(2) ऑनलाईन ई-लिलाव विक्रीत सहभागी होण्यासाठी कंपनी असल्यास, बयाणा रकमेसह बोली दस्तावेज, पॅन कार्डच्या प्रती, मंडळाचा ठराव आणि फोटो ओळखपत्र, पत्त्याचा पुरावा इ. सादर करावे लागतील आणि बयाणा रक्कम ही एयू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड चे एमएसएमई ऑक्शन पूल खाते, चालू खाते क्र.: 1921201121711599 एयू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड, पाचवा व सहावा मजला, सनी बिग जंक्शन एसटीसी खसरा क्र. 64 ते 67, ग्राम सुखईपुरा, न्यु अतिश मार्केट, जयपूर 302020, आयएफएससी कोडः AUBL0002011. एकदा ऑनलाईन बोली सादर केली की ती मागे घेता येणार नाही. त्याशिवाय, बोलीदाराने सादर केलेल्या बयाणा रकमेसह रद्द केलेल्या धनादेशाच्या एका प्रतीसह आरटीजीएस / एनईएफटी चा यूटीआर / संदर्भ क्र. **auctions@aubank.in** या ईमेल आयडीवर पाठविणे आवश्यक आहे.

(3) सर्व इच्छुक सहभागी / बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी ई-लिलाव विक्री प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी अटी व शर्तींसह अधिक तपशीलासाठी **https://sarfaesi.auctiontiger.net** आणि **https://www.aubank.in/bank-auction** येथे भेट द्यावी आणि ईमेल आयडी **auctions@aubank.in** येथे संपर्क साधावा.

**कृपया लक्षात घ्यावे की** ही नियम 9 (1) सह वाचण्यात येणारया नियम 8 (6) अंतर्गत वर नमूद कर्ज खात्यातील कर्जदार/ सह- कर्जदार / गहाणकारांसाठी वर नमूद दिनांकास निविदा / आपसांत बोली करून विक्री करण्यात येणार असल्याची 15 दिवसांची सूचनादेखील आहे. विहित सूचना कालावधीत कर्जदाराने थकबाकी रकमेचा संपूर्ण भरणा न केल्यास मालमत्तेची विक्री करण्यात येईल.

**दिनांकः 02/08/2024**
**स्थानः अहमदनगर**

**प्राधिकृत अधिकारी**
**एयू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड**

---

## Canara Bank

**लार्ज कॉर्पोरेट शाखा - बीकेसी :** कॅनरा बँक बिल्डिंग, ए विंग, १ ला मजला, सी-१४, जी ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१ । **ई.:** cb5310@canarabank.com

**शुद्धिपत्रक**

लोकसत्ताच्या सर्व आवृत्त्यांमध्ये ०२ ऑगस्ट २०२४ रोजी प्रसिद्ध झालेल्या स्विस चॅलेंज मेथड अंतर्गत कर्ज सुविधेच्या तडजोड प्रस्तावासाठी ई-लिलाव सूचनेच्या संदर्भात. सूचनेमध्ये **ईओआय आणि इरठेव्या सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक १९ ऑगस्ट २०२४** ऐवजी **१६ ऑगस्ट २०२४** नमूद करण्यात आले आहे. तसेच **श्री. ऋषी शाह** यांचे नाव चुकीने **श्री. ऋषी सेन** असे छापण्यात आले आहे.

BOBCAPS (A wholly owned subsidiary of Bank of Baroda)

सही/-
**श्री. दीपेश देवचंद देढीय - डीजीएम आणि श्रीमती ज्योती शर्मा - मुख्य व्यवस्थापक डीलिंग ऑफिसर्स, कॅनरा बँक**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ऑगस्ट ०२, २०२४**

---

## बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

**शाखा : वैजापूर**
स्टेशन रोड, म्हसोबा चौक, SBI मोंढा शाखेजवळ, वैजापूर जि.छत्रपती संभाजीनगर

**ताबा सूचना** (अचल मालमत्तेसाठी)

**[ सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ चे नियम ८(१) ]**

ज्या अर्थी खालील सही करणार **बँक ऑफ बडोदा चे** अधिकृत अधिकारी यांनी दि सिक्युरिटायजेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल असेटस् अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ऑर्डीनन्स अॅक्ट २००२ (Second) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (Ord.3 of 2002) नियम २००२ मधील नियम ९ सह वाचले जाणारे कलम १३(१२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कर्जदार **मे.एस.एस.अॅग्रो इंडस्ट्रीज, प्रोप्रा.श्री.सतीश सुरेश सवई** जामीनदार **१)श्री.योगेश सुरेश सवई, २) श्री.दादासाहेब आण्णासाहेब बांदल** यांना **दि.२४/०४/२०२४** रोजी मागणी नोटीस पाठवून त्यामधे नमुद रक्कम **रू.२,५९,०१,०८८.२५** (रू.दोन करोड एकोन्साठ लाख एक हजार अठ्ठ्यांशी व पैसे पंचवीस केवळ) + त्यावरील व्याज, इतर शुल्क आणि खर्च वजा वसुल जर काही केलेली असेल तर त्यांनी त्यांना नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांचे आंत भरणेस कळविले होते.

उपरोक्त नोटीसप्रमाणे मागणी केलेली संपूर्ण रक्कम मुदतीत भरण्यास कर्जदार/जामीनदार यांनी कसूर केलेली आहे. त्या अर्थी, कर्जदार/जामीनदार व तमाम जनतेस कळविण्यात येते की, खाली सही करणार यांनी खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीचा सदरील ऑर्डीनन्स कायद्याचे नियम ९ सह वाचले जाणारे कलम १३(४) अन्वये बहाल अधिकारन्वये खालील मिळकतीचा दिनांक **०१/०८/२०२४** रोजी **सांकेतिक ताबा** घेतला आहे.

सबब विशेषत: कर्जदार व तमाम जनतेस सूचित करण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीबाबत कोणीही, कसल्याही प्रकारचा व्यवहार करू नये. याउपर कोणीही सदरील मिळकतीबाबत व्यवहार केल्यास तो व्यवहार **बँक ऑफ बडोदा, वैजापूर शाखा** यांचा **रू.२,५९,०१,०८८.२५** (रू.दोन करोड एकोन्साठ लाख एक हजार अठ्ठ्यांशी व पैसे पंचवीस केवळ) + त्यावरील व्याज, इतर शुल्क आणि खर्च वजा वसुल जर काही केलेली असेल तर यांच्या बोजासहीत असेल.

**अचल मालमत्तेचे विवरण**

**सर्व भाग व पोटभाग हिस्यांसहीत प्लॉट क्र.एम-५९, एमआयडीसी श्रीरामपूर, मौजे खंडाळा हद्दीत, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर, क्षेत्रफळ १000 चौ.मी.,** ज्याची चतुःसिमा .

**पुर्वेस** : प्लॉट क्र.एम-६० — **पश्चिमेस** : प्लॉट क्र.एम-५८
**दक्षिणेस** : रोड — **उत्तरेस** : प्लॉट क्र.एम-४३ व एम-४४

सध्याचे व भविष्यातील हक्क, फायदे, विषेशाधिकार, सदरील मालमत्ते मधील आरामदायी हक्कांसहीत आणि त्यावरील बांधकामासहीत.

**दिनांक : ०१/०८/२०२४**
**ठिकाण : श्रीरामपूर**
**(टिप : स्वैर भाषांतर, तफावत पडल्यास मुळ इंग्रजी ग्राह्य)**

**सही /-**
**प्राधिकृत अधिकारी**
**बँक ऑफ बडोदा**

SHREE

---

**माननीय कंपनी कायदा न्यायासन, मुंबई खंडपीठ, यांचेसमोर**

**कंपनी योजना याचिका क्रमांक: सीपी(सीएए)/१३३/(एमबी)२०२४**

**या संदर्भात**

**कंपनी योजना याचिका क्रमांक: सी.ए.(सीएए)/८६/एमबी-४/२०२४**

**कंपनी कायदा २०१३ मधील कलम २३० आणि २३२ आणि इतर लागू तरतुदींच्या प्रकरणी**

**आणि**

**ई-एटिन.कॉम लिमिटेड आणि त्यांचे भागधारक व क्रेडिटर्स आणि टीव्ही१८ ब्रॉडकास्ट लिमिटेड आणि त्यांचे भागधारक व क्रेडिटर्स आणि नेटवर्क१८ मिडिया अॅण्ड इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेड आणि त्यांचे भागधारक व क्रेडिटर्स यांच्यामधील एकत्रित व्यवस्थेच्या योजनेच्या प्रकरणी**

**ई-एटिन.कॉम लिमिटेड,** कंपनी कायदा,१९५६ मधील तरतुदींच्या अंतर्गत स्थापन करण्यात आलेली कंपनी, जिचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक: U99999MH2000PLC274703 असून त्यांचे नोंदणीकृत कार्यालय पहिला मजला, एम्पायर कॉम्प्लेक्स, ४१४-सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई - ४०० ०१३, महाराष्ट्र, भारत येथे आहे. ) **...प्रथम याचिकाकर्ता कंपनी/ ई१८/ विलिन होणारी कंपनी १**

**टीव्ही१८ ब्रॉडकास्ट लिमिटेड,** कंपनी कायदा,१९५६ मधील तरतुदींच्या अंतर्गत स्थापन करण्यात आलेली कंपनी, जिचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक: L74300MH2005PLC281753 असून त्यांचे नोंदणीकृत पहिला मजला, एम्पायर कॉम्प्लेक्स, ४१४-सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई - ४०० ०१३, महाराष्ट्र, भारत येथे आहे. ) **...द्वितीय याचिकाकर्ता कंपनी/ टीव्ही१८/ विलिन होणारी कंपनी २**

**नेटवर्क१८ मिडिया अॅण्ड इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेड ,** कंपनी कायदा,१९५६ मधील तरतुदींच्या अंतर्गत स्थापन करण्यात आलेली कंपनी, जिचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक: L65910MH1996PLC280969 असून त्यांचे नोंदणीकृत कार्यालय पहिला मजला, एम्पायर कॉम्प्लेक्स, ४१४-सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई - ४०० ०१३, महाराष्ट्र, भारत येथे आहे. ) **...तृतीय याचिकाकर्ता कंपनी/ नेटवर्क१८/ विलिन करून घेणारी कंपनी**

**...एकत्रितपणे याचिकाकर्ता कंपनी असे संबोधण्यात येईल**

**कंपनी योजना याचिकेच्या सुनावणीची सूचना**

कंपनी कायदा २०१३ मधील कलम २३० आणि २३२ आणि इतर लागू तरतुदींच्या अंतर्गत, ई-एटिन.कॉम लिमिटेड आणि त्यांचे भागधारक व क्रेडिटर्स आणि टीव्ही१८ ब्रॉडकास्ट लिमिटेड आणि त्यांचे भागधारक व क्रेडिटर्स आणि नेटवर्क१८ मिडिया अॅण्ड इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेड आणि त्यांचे भागधारक व क्रेडिटर्स यांच्या एकत्रित व्यवस्थेची योजना मंजुर करण्यासाठी याचिकाकर्ता कंपनीने दिनांक १२ जुलै, २०२४ रोजी एक कंपनी योजना याचिका दाखल केली होती आणि माननीय कंपनी कायदा न्यायासन, मुंबई खंडपीठ, **(''एनसीएलटी'')** यांनी त्यांच्या दिनांक २५ जुलै, २०२४ च्या आदेशाद्वारे ती दाखल करून घेतली. माननीय एनसीएलटी यांचेसमोर दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता किंवा त्यानंतर लवकरच सदर कंपनी योजनेच्या याचिकेची सुनावणी आणि अंतिम निकाल निश्चित करण्यात आली आहे.

कोणाही व्यक्तीचा सदर कंपनी योजनेच्या याचिकेला पाठबळ देण्याची किंवा विरोध करण्याची इच्छा असल्यास त्यांनी ती याचिकाकर्ता कंपनीचे वकिल - श्री. राज पंचमतिया, पार्टनर, मेसर्स खैतान अॅण्ड कंपनी यांचेकडे **raj.panchmatia@khaitanco.com** येथे (सॉफ्ट कॉपी स्वरूपात) आणि/ किंवा मेसर्स खैतान अॅण्ड कंपनी, वन फोर्बस, ३रा व ४था मजला, डॉ. व्ही. बी. गांधी मार्ग, मुंबई - ४०० ००१, भारत (छापील प्रत), सदर उद्देशासंबंधी लेखी स्वरूपातील, त्यांनी/तिने किंवा त्यांच्या/तिच्या वकिलाने स्वाक्षरी केलेली आणि त्यांचे/तिचे संपूर्ण नाव व पत्ता असलेली सूचना, सदर कंपनी योजनेच्या याचिकेच्या सुनावणीसाठी आणि अंतिम निकालासाठी निश्चित करण्यात आलेल्या तारखेच्या दोन दिवस अगोदर पोहोचेल अशा प्रकारे पाठवावी. जेथे त्यांना/तिला कंपनीच्या योजनेच्या याचिकेला विरोध करायचा असल्यास, विरोधाचे कारण किंवा त्यांच्या/तिच्या प्रतिज्ञापत्राची प्रत सदर सूचनेसोबत सादर करावी.

विहित शुल्क भरल्यास खालील स्वाक्षरी करणारे कोणाही व्यक्तीला कंपनी योजनेच्या याचिकेची प्रत सादर करतील.

**आज दिनांक ३ ऑगस्ट, २०२४ रोजी**

**ठिकाण: मुंबई**

**स्वाक्षरी/-**
**राज पंचमतिया, पार्टनर**
**मेसर्स खैतान अॅण्ड कंपनी**
**याचिकाकर्ता कंपनीचे वकिल**

---

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-४११०१८

**स्थापत्य प्रकल्प विभाग**

**ई-निविदा सूचना क्र. स्थापत्य/प्रकल्प/११/०२/२०२४-२०२५**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून खालील नमूद केलेल्या कामांसाठी ई-टेंडरिंग पद्धतीने परसेंट रेट निविदा मागविण्यात येत आहेत.

१) निविदेचा दर भरताना एकूण निविदा रकमेतून रॉयल्टी रक्कम व मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून आलेल्या रकमेवर निविदा दर भरावा.
२) प्रचलित दराने GST बिलात अदा केली जाईल, त्यामुळे GST वगळून दर द्यावेत.
३) रॉयल्टीबाबत म.न.पा. जे धोरण ठरवेल ते आपणावर बंधनकारक राहील.

| अ. क्र. | कामाचे नाव | एकूण निविदा रक्कम (४+६) | रॉयल्टी व मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टीची रक्कम | मटेरियल टेस्टींग चार्जेस | बयाणा रक्कम | अनामत रक्कम | कामाची मुदत (महिने) | निविदा फॉर्म फी 'जीएसटी' सह (परत न मिळणारी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. |
| १) | सांगवी फाटा ते किवळे रस्त्यावर रक्षक चौक येथे सबवे बांधणे. | रु. २२७,७४९,२५९ | रु. २२७,४८०,९२४ | रु. ६,४९०,१२३ | रु. २६८,३३५ | रु. १,१३८,७४६ | रु. ११,३८७,४७० | १८ महिने | रु. ३७,४३० |
| १) | पिंपळे सौदागर प्रभाग क्र. २८ येथील शिवार चौक ते गोविंद गार्डन चौक पर्यंतचा (कुणाल आयकॉन रस्ता) अद्यावत पद्धतीने विकसित करणे. | रु. ४२४,३९०,९६८ | रु. ४२४,१४३,१७३ | रु. ७,६७६,९७१ | रु. २४७,७९५ | रु. २,१२१,९५५ | रु. २१,२१९,५५० | ३० महिने | रु. ३७,४३० |

| निविदेचे वेळापत्रक अ. क्र. १ चे कामासाठी | | |
|---|---|---|
| **ई निविदा उपलब्ध कालावधी** | : | दिनांक ०५/०८/२०२४ ते दिनांक १२/०८/२०२४ |
| **निविदा स्विकृती अंतिम दिनांक व वेळ** | : | दिनांक १२/०८/२०२४, दुपारी ०३.०० वा.पर्यंत |
| **निविदापुर्व बैठक दिनांक व वेळ** | : | दिनांक ०९/०८/२०२४, दुपारी ०३.०० वा. |
| **निविदापुर्व बैठक स्थळ** | : | मा. मुख्य अभियंता कार्यालय, स्थापत्य प्रकल्प विभाग पिं.चिं.मनपा, पिंपरी, पुणे-18. |
| **निविदा उघडणेचा दिनांक** | : | दिनांक १२/०८/२०२४, दुपारी ०३.०० वा.(शक्य झाल्यास) |
| **निविदेचे वेळापत्रक अ. क्र. २ चे कामासाठी** | | |
| **ई निविदा उपलब्ध कालावधी** | : | दिनांक ०५/०८/२०२४ ते दिनांक १९/०८/२०२४ |
| **निविदा स्विकृती अंतिम दिनांक व वेळ** | : | दिनांक १९/०८/२०२४, दुपारी ०३.०० वा.पर्यंत |
| **निविदापुर्व बैठक दिनांक व वेळ** | : | दिनांक ०९/०८/२०२४, दुपारी ०३.०० वा. |
| **निविदापुर्व बैठक स्थळ** | : | मा. मुख्य अभियंता कार्यालय, स्थापत्य प्रकल्प विभाग पिं.चिं.मनपा, पिंपरी, पुणे-१८. |
| **निविदा उघडणेचा दिनांक** | : | दिनांक २१/०८/२०२४, दुपारी ०३.०० वा. (शक्य झाल्यास) |

कोणतेही कारण न देता निविदा पूर्णतः किंवा अंशतः मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. आयुक्त यांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे. निविदा संचाची विक्री **https://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर ई-निविदा सूचनेत नमूद केलेल्या तारखेनुसार सुरु राहील.
सविस्तर निविदा व निविदेबाबतची इतर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
(1) www.pcmcindia.gov.in (2) https://mahatenders.gov.in
सदरची ई-निविदा प्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास NIC यांचेकडील ई-मेल support-eproc@nic.in अथवा Help Desk Number 0120-4200462, 0120-4001002, 0120-4001005, 0120-6277787 या दूरध्वनीवर संपर्क साधावा.

(सही/-) **श्रीकांत सवणे,**
**- मुख्य अभियंता,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे-४११०१८

जाहिरात क्र. ८६
का. क्र. स्था/नि/१४/कावि/१३६/२०२४
दिनांक ०२/०८/२०२४

---


## लोकसत्ता Classifieds

FROM ANYTHING TO EVERYTHING.

### मालमत्ताविषयक

चला कोंकणात दहा एकर जमीन २५,००,००० गोवा मुंबई पुण्याजवळ रोहाऊसेस घर विविध पर्यटनस्थळी नदी डॅम समुद्रलगत प्लॉट बुकिंगसाठी- 8080866961/ 8828337316.
0070915492-2

प्लॉट विकणे आहे. कुंभारमाठ मालवण. ९८ गुंठे जागा. घर/ रिसॉर्ट/ प्लॉटिंगसाठी उपयुक्त. संपर्क- 9423784349.
0040741050-2

### यात्रासहल

दोस्तीटूर *शास्त्रोक्त नर्मदापरिक्रमा *कुरवपुरम- पिठापुरम *त्रिस्थळी- अयोध्या- नैमिष्यआरण्य *केरळ-तमिळनाडू *चारधामयात्रा *भुतान *आसाम- पूर्वांचल *नेपाळ *कोस्टल कर्नाटका *श्रीलंका. 9594880123/ 9702251584
0070915287-1

### भविष्यविषयक

अॅस्ट्रॉलॉजी : गोल्ड मेडलिस्ट, जन्मकुंडली बनविणे, जुळविणे, जन्मकुंडलीवरून तसेच हस्तरेषा- चेहरा, फोटोवरून आपल्या प्रश्नांवर सविस्तर भविष्य तसेच वास्तुशास्त्राचे महत्त्व, वास्तुशांतीचे साधे-सोपे उपाय ५० पानांवर लिहून मिळतील. पाहिजे असल्यास हिंदी/ इंग्रजीमधून लिखाण मिळेल. (प्रश्नांची फी एकदाच सुरुवातीला स्वीकारतो.) नवग्रहांचे रत्ने, भाग्योदय यंत्रे, रुद्राक्ष इतर शुभवस्तू सुचवितो व अनुष्ठान करून दिले जातील. मुख्य कार्यालय श्री. सुधाकर सदानंद जोशी, कु. यशश्री सुधाकर जोशी. सोमवार ते शनिवार सकाळी १० ते संध्याकाळी ६ योगीनिवास बंगला, पहिला मजला, किसन क्रॉस रोड, नवीन पोलीस क्वार्टर्सजवळ, मालाड (पश्चिम), मुंबई- ४०००६४. ९८२०५५३२७६/ ९८२०६१२५७८. (वरील पत्त्याशिवाय आमची कुठेही शाखा अथवा प्रतिनिधी नाहीत.)
0070912268-1

जाहिरात छोटी प्रतिसाद मोठा

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (अॅडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.